MHNG170004122023

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :– | १२.०७.२०२३ |
| नोंदणी तारीख | :– | १२.०७.२०२३ |
| निकाल तारीख | :– | ०५.०५.२०२६ |
| कालावधी | :– | वर्ष, महीने, दिवस<br>०४, ०९, २४ |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भिवापूर, तह. भिवापूर, जि. नागपूर**
**(पिठासीन अधिकारी श्री. एस.जे. लाड)**

**नियमित फौजदारी खटला क्र.४७/२०२३** **निशाणी क्र.१८.**

**प्रथम खबर मधील तपशिल :–**

**अपराध क्रमांक** : २२२/२०२३, दिनांक २५.०५.२०२३

**पोलीस स्टेशन** : भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष –** | महाराष्ट्र सरकारतर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ –** | श्री एस. एस. मोरे |
| **आरोपी –** | **प्रशांत बाबुराव मेश्राम,**<br>वय ३६ वर्षे, व्यवसाय– –,<br>रा. सुरगाव, ता.उमरेड, जि.नागपूर. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ –** | श्री पी.एस.हुंगे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | २५.०५.२०२३ |
| गुन्हा दाखल तारीख | २५.०५.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १२.०७.२०२३ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | १४.११.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २०.०१.२०२६ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | ०५.०५.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | –––– |

## आरोपीचे विवरण

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा अथवा निर्दोष मुक्त | शिक्षेबाबत विवरण | उपभोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रशांत बाबुराव मेश्राम | २५.०५.२०२३ | २५.०५.२०२३ | कलम ३७९ भारतीय दंड विधान | आरोपी निर्दोष मुक्त | –– | ––– |

## तपासलेले साक्षीदार

अ. अभियोग पक्षातर्फे :–

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | प्रकाश फकीरा धाडसे | घटनास्थळ पंच | ४ |
| सा.क्र.२ | अयुब खान अजीज खान पठान | घटनास्थळ पंच | ६ |
| सा.क्र.३ | जयपालसिंग नाथेसिंग गिरासे | फिर्यादी | ८ |
| सा.क्र.४ | प्रविन यशवंतराव जाधव | तपास अधिकारी | १४ |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

## निशाणी क्रमांकाची यादी

अ. अभियोगपक्षातर्फे **:–**

| अ.क्र. | निशाणी | पुराव्याचे स्थान |
|---|---|---|
| | नि.क्र.९ | समन्स |
| १. | नि.क्र.१० | घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| २. | नि.क्र.११ | फिर्याद |
| ४. | नि.क्र.१२ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ५. | नि.क्र.१५ | तहसीलदारांना दिलेले पत्र |
| ६. | नि.क्र.१६ | आर.टी.ओ.ला दिलेले पत्र |
| ७. | आर्टिकल अ | अहवाल |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | – | टिप्पर क्र.एम.एच.४०–बी.एल.३३७४ हा ६ ब्रास रेतीसह |

## न्या य नि र्ण य

## (दिनांक ५ मे, २०२६ रोजी पारीत)

आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरिता संपरीक्षा चालविण्यात आली.

**अभियोग पक्षाची संक्षिप्त हकीकत :–**

**२.** घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी जयपालसिंह गिरासे हे दिनांक २५.०५.२०२३ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी ते पोलीस स्टेशन भिवापूर येथे हजर असताना गोपनिय माहिती मिळाली की, टिप्पर क्र.एम.एच.४०–बी.एल.३३७४ चा चालक हा ब्रम्हपुरीकडून विना परवाना रेतीची वाहतुक करीत भिवापूर मार्गे नागपूरकडे जाणार आहे. त्यानंतर ते पोलीस हवालदार राकेश त्रिपाठी यांचेसह सान्हा क्र.४/२०२३ वेळ ५.२२ वा. प्रमाणे रवाना

होवून टी पॉईंट राष्ट्रीय महामार्ग क्र.३५९(डी) वर नाकाबंदी लावून पंच व स्टाफसह पाळत ठेवली असता काहीच वेळात अंदाजे ५.५० वा. सुमारास निलज फाट्याकडून टिप्पर क्र.एम.एच.४०–बी.एल.३३७४ हा येताना दिसला. सदर वाहन चालकास थांबविण्यास इशारा केला. त्यानंतर चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने प्रशांत मेश्राम असे सांगितले. सदर टिप्परची पाहणी केली असता त्यामध्ये सहा ब्रास रेती आढळून आली. सदर चालकास मालकीहक्काबाबत विचारले असता त्याने स्वतः मालकीचे वाहन असुन रेती वाहतुकीची रॉयल्टी नाही असे सांगितले. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा केला व त्यानंतर ते पोलीस स्टेशनला गेले फिर्याद दाखल केले.

३. फिर्यादीचे उपरोक्त आशयाच्या बयानावरुन, आरोपीविरुध्द अपराध क्र.२२२/२०२३ भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ कायद्यान्वये पोलीस स्टेशन, भिवापूर येथे गुन्ह्याची नोंद केली. सहाय्यक पोलीस हवालदार प्रविन जाधव यांच्याकडे तपास सोपविला. त्यांनी तपासा दरम्यान, तहसीलदार व आर.टी.ओ. ला पत्र दिले व साक्षीदारांचे बयान नोंदवून तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी आरोपीविरुध्द नि.क्र.२ वर दोषारोप निश्चीत केला. आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगीतला. आरोपीची जबानी नि.क्र.३ वर नोंदविण्यात आली. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून संपरीक्षा चालविण्याची विनंती केली. साक्षीदारांच्या बयानात आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळून आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अंतर्गत बयान निशाणी क्रमांक १७ वर नोंदविण्यात आले. आरोपीने खोटी केस असल्याचा बचाव घेतला.

५. अभियोग पक्षाचा खटला, आरोपीचा बचाव, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. मोरे व आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री. पी.एस.हुंगे यांचे युक्तीवादावरुन खालील मुद्दे निर्धारणाकरीता उपस्थीत होतात, त्यांना मी सहकारण निष्कर्ष देत आहे.

६. विचारार्थ निर्माण झालेले मुद्दे :–

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपीने दिनांक २५.०५.२०२३ रोजी ५.५० ते ६.२० वाजताचे दरम्यान टि पॉईंट पोलीस स्टेशन भिवापूर, ता.भिवापूर, येथे आरोपी प्रशांत बाबुराव मेश्राम याचा टिप्पर एम.एच.४०–बी.एल.३३७४ मधुन अवैधरित्या गौण खनिज ६ ब्रास रेती शासनाच्या संमतीशिवाय अप्रामाणिकपणे चोरी केली व भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ अन्वये गुन्हा केला काय ? | ... | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय? | ... | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत :–**

**७.** अभियोग पक्षाने गुन्हा सिध्दतेकामी एकूण चार साक्षीदार तपासले. फिर्यादी जयपालसिंह नाथेसिंह गिरासे (सा.क्र.३) याला नि.क्र.८ वर तपासले. त्याने त्याचे पुराव्यात असे कथन केले की, दि.२५.०५.२०२३ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी ते पोलीस स्टेशनला हजर असताना मुखबीरद्वारे खबर मिळाली की, एक टिप्पर विना परवाना रेती घेवून जाणार आहे. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना समन्स दिला व टि पॉईंट राष्ट्रीय महारार्ग ३५९–डी वर नाकाबंदी केली. तेथे एक टिप्पर येताना दिसला. त्याला थांबवून त्याचे चालकाकडे विचारपूस केली व टिप्परची पाहणी केली त्या टिप्परचा क्र. एम.एच.४०–बी.एल.३३७४ असा होता. त्या टिप्परच्या पाहणीच्या दरम्यान त्यामध्ये सहा ब्रास रेती आढळून आली. चालकाला परवान्याबाबत विचारपूस केली असता त्याने नकार दिली. त्यानंतर घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार करुन फिर्याद दाखल केली. त्याच्या पुराव्यात

समन्स नि.क्र.९, घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा नि.क्र.१०, फिर्याद नि.क्र.११ व छापील प्रथम खबर अहवाल नि.क्र.१२ वर सिद्ध करण्यात आले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नाकारार्थी उत्तर दिले.

८. त्यानंतर अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच प्रकाश फकीरा धाडसे (सा.क्र.१) याला नि.क्र.४ वर तपासले. त्याने अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितूर घोषित केले व त्याचा सविस्तर उलट तपास घेतला, परंतु, त्यामध्ये अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काही आले नाही. त्यानंतर अभियोग पक्षाने दुसरा घटनास्थळ पंच अयुब खान अजीज खान पठान (सा.क्र.२) याला नि.क्र.६ वर तपासले. त्याने अभियोग पक्षास सहकार्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्याला फितूर घोषित केले व त्याचा सविस्तर उलट तपास घेतला, परंतु, त्यामध्ये अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काही आले नाही.

९. सरतेशेवटी अभियोग पक्षाने तपास अधिकारी प्रविन यशवंतराव जाधव (सा.क्र.४) याला नि.क्र.१४ वर तपासले. त्यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले की, दिनांक २५.०५.२०२३ रोजी ते पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणुन ड्युटीवर होते. त्यादिवशी गुन्हा क्रमांक २२२/२०२३ नोंद झाला होता. त्याचा तपास त्यांच्याकडे आला. तपासादरम्यान त्यांनी प्राथमिक तपास केलेले कागदपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे बयान नोंदविले, त्यांच्या पुराव्यात तहसीलदारांना दिलेले पत्र नि.क्र.१५, आर.टी.ओ.ला दिलेले पत्र नि.क्र.१६ व वाहनाच्या वजनाचा अहवाल आर्टिकल अ वर सिद्ध करण्यात आला. त्यानंतर वाहनाचे कागदपत्र हस्तगत केले व तपासाअंती तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांनी सर्व उत्तर सुचक प्रश्नांना त्यांनी नकारात्मक उत्तर दिले.

१०. वर नमुद साक्षीदारांचे बयानांचे अवलोकनकरिता असे निर्दशनास येते की, अभियोग पक्षाने केवळ दोन स्वतंत्र साक्षीदार म्हणजे पंच प्रकाश फकीरा धाडसे (सा.क्र.१) व अयुब खान अजीज खान पठान (सा.क्र.२) यांना तपासले. त्या व्यतिरिक्त

सर्व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत. प्रस्तुत खटल्यात तपास अधिकारी प्रविन यशवंतराव जाधव (सा.क्र.४) व फिर्यादी जयपालसिंह नाथेसिंह गिरासे (सा.क्र.३) यांनी आरोपींवरील गुन्हा सिद्ध करणेकामी केवळ फिर्याद नोंदवून घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला या व्यतिरिक्त तपासामध्ये केवळ साक्षीदारांचे बयान नोंदविलेले आहे. तसेच तहसीलदार व प्रादेशिक परिवहन विभाग यांना पत्र दिलेले आहे. माझ्या मते, तहसीलदार व प्रादेशिक परिवहन विभाग यांना दिलेले पत्र हे त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या कारवाई संदर्भात आहेत. प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाला हे सिद्ध करायचे आहे की, घटनेच्या दिवशी आरोपी हे त्यांचे टिप्परमध्ये विना परवाना रेती चोरी करुन घेऊन जात होते किंवा नाही. त्या अनुषंगाने संपूर्ण अभियोग पक्षाच्या पुराव्यात केवळ घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा यावर भिस्त आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यातील दोन्ही साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तसेच, त्या साक्षीदारांव्यतिरिक्त फिर्यादी जयपालसिंह नाथेसिंह गिरासे (सा.क्र.३) व तपास अधिकारी प्रविन यशवंतराव जाधव (सा.क्र.४) यांनी इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदारांचे किंवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे बयान नोंदविलेले नाहीत. त्यामुळे घटनेच्या दिवशी जप्त केलेला टिप्पर हा आरोपी चालवत होता व त्यामध्ये विना परवाना रेती होती हे स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिद्ध झालेले नाही.

**११.** आरोपी क्र.१ विरोधात अभियोग पक्षाचा संपूर्ण खटला हा फिर्याद व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा केवळ यावर अवलंबून आहे. त्यामध्येही घटनास्थळ पंचांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे ते देखील स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिद्ध झालेले नाही. त्यामुळे वरील सर्व चर्चेअंती पुरेशा पुराव्या अभावी आरोपींविरुद्ध खटला हा संशयापलीकडे जाऊन सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपी हे निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत</u> :–**

**१२.** मुद्दा क्रमांक १ च्या निष्कर्षावरुन असे दिसून येते की, आरोपी हे निर्दोष होण्यास पात्र आहेत. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**<u>१.</u>** आरोपी **प्रशांत बाबुराव मेश्राम** याला भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यातून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) नूसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

**<u>२.</u>** आरोपींनी पुर्वी दिलेले बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

**<u>३.</u>** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रुपये १५,०००/– चा वैयक्तीक जामिन व त्याच रक्कमेचा जामिनदार द्यावा.

**<u>४.</u>** या खटल्यात जप्त असलेला टिप्पर क्र.एम.एच.४०–बी.एल.३३७४ हा सुप्रतनाम्यावर परत करण्यात आला असल्यास, सुप्रतनामा बंधपत्र रद्द करण्यात यावा. तसेच, वर नमुद टिप्पर जप्त असल्यास वाहनाच्या नोंदणीकृत मालकास वर नमुद टिप्परचे कागदपत्रांची पडताळणी केल्यावर अपील कालावधीनंतर परत करण्यात यावे.

**<u>५.</u>** खटल्यात जप्त ६ ब्रास रेती तालुका दंडाधिकारी, भिवापूर यांच्याकडे सुपूर्द करुन, त्यांनी नियमानुसार विल्हेवाट करुन प्राप्त रक्कम शासनास जमा करावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

LAD SURAJ JANARDAN
Digitally signed by LAD SURAJ JANARDAN
Date: 2026.05.05 15:01:26 +0530

(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

भिवापूर.
दिनांक – ०५.०५.२०२६.

<u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : Ku. K. S. Kathane
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur.